# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**गुरुवार, दिनांक २१ मार्च, २०१३**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

**सामाजिक न्याय मंत्री** : **"अपंगांना मोफत वाटप करावयाच्या तीन चाकी सायकली ३ वर्षांपासून जिल्हापरिषद, औरंगाबादच्या गोदामात पडून असल्याबाबत"** या विषयावरील श्री.प्रशांत बंब, वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ७४०८५ ला दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**चार : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री जितेंद्र आव्हाड**, शशिकांत शिंदे, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, विष्णू सवरा, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"ठाणे येथील मुंब्रा परिसरामध्ये सद्यस्थितीत मोठया प्रमाणात पाण्याची टंचाई निर्माण झालेली असल्याची माहे मार्च, २०१३ मध्ये उघडकीस आलेली गंभीर माहिती, वाढत्या लोकसंख्येला नियमित पाणीपुरवठा करण्यास महापालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपयश येत असल्याने निर्माण झालेली परिस्थिती, मुंब्रा, कौसा भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक त्रासदायक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, मुंब्रा विभागातील पाणी वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी राबविण्यात येत असलेली १२० कोटी रुपयांच्या योजनेची कार्यवाही

अत्यंत संथगतीने सुरू असणे, मुंब्रा विभागातील नागरिकांना मुबलक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधितांसमवेत अनेकदा बैठका घेण्यात आलेल्या असणे, विधानसभा सभागृहामध्ये वारंवार उपस्थित केलेल्या चर्चेच्या वेळी तत्कालीन मा.मुख्यमंत्री तसेच नगरविकास राज्यमंत्री यांनी आश्वासित केले असतानाही अद्यापपर्यंत येथील पाणीपुरवठा सुरळीत झालेला नसल्याने येथील लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक संस्थांनी मा.मुख्यमंत्री, आयुक्त, ठाणे महापालिका यांचेकडे दिनांक ०४ मार्च, २०१३ तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतानाही सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात होत असलेली दिरंगाई, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी मुंब्रा परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात पाणी उपलब्ध होत नसल्याने निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, मुबलक पाणीपुरवठा केला जावा याकरिता मुंब्रा प्रभाग समित्यांवर केली जात असलेली आंदोलने, विधीमंडळाच्या अधिवेशनात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा दिलेला इशारा, मुंब्रा परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासंदर्भात प्रशासनाचे हेतूपुरस्सर दुर्लक्ष होत असल्याने सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करून त्वरित कार्यवाही करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(२) **सर्वश्री.नाना पटोले,** गोवर्धन शर्मा, हरिष पिंपळे, डॉ.संजय कुटे, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी, विजय वडेट्टीवार, राजकुमार बडोले, संभाजी पवार, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी केंद्र शासन व राज्य शासनाकडून विविध सवलती मिळत असणे,राज्यात दारिद्रयरेषेखालील कुटुंबासाठी उत्पन्नाची मर्यादा वार्षिक रूपये २१,००० असून हल्लीच्या महागाईच्या काळात कोणत्याही कुटुंबाच्या उत्पन्नाची मर्यादा रूपये २१,००० च्या वर असून ही कालबाह्य गोष्ट असणे, त्यामुळे दारिद्रयरेषेखालील उत्पन्नाचे दाखले घेण्यासाठी खोटी शपथ घेऊन तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना लाच देऊन बनावट उत्पन्नाचे दाखले घेत असणे, कोणत्याही ४ व्यक्तींच्या कुटुंबाच्या गरजा रूपये २१००० उत्पन्नामध्ये वर्षभर भागविणे शक्यच नसणे, असे असताना दारिद्रयरेषेखालील व्यक्तींचा लाभ मिळविण्यासाठी बनावट दाखले घेतले जात असणे, त्यामुळे दारिद्रयरेषेखालील कुटुंबासाठी लावण्यात येणाऱ्या निकषांमध्ये बदल करुन व सुधारित यादी तयार करून दारिद्रयरेषेसाठी असणाऱ्या उत्पन्नाची वार्षिक मर्यादा किमान १ लाख रूपये करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(३) **डॉ. नामदेव उसेंडी,** सर्वश्री.विजय वडेट्टीवार, विरेंद्र जगताप, ॲड.यशोमती ठाकूर, सर्वश्री सुधाकर देशमुख, देवेंद्र फडणवीस, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, पंकज भुजबळ, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यात गावकऱ्यांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी नक्षलवाद्यांनी हिंसाचार, जाळपोळ व स्फोटकांचा उद्रेक करुन लेखा-गोडवलवाही मार्गावर पुण्यातील एका खासगी बांधकाम कंपनीचे ट्रॅक्टर, जेसीबी, रोड रोलर, मोटरसायकल व

पाण्याचे टँकर अशी २७ वाहने एकाच वेळी जाळून दहशत निर्माण केल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१३ च्या सुमारास निदर्शनास येणे, गडचिरोलीत मोठ्या प्रमाणात रस्त्यांची तसेच शासकीय इमारतींची कामे सुरु असणे, धानोरा तालुक्यातील धानोरा-पेंढरी या रस्त्याचे काम पुण्यातील एका नामांकित कंपनीला मिळाले असून त्याकरिता स्थानिकांचे २० ट्रॅक्टर, दोन जेसीबी मशीन, एक रोड रोलर, दोन पिण्याच्या पाण्याचे टँकर, दोन मोटरसायकल व इतर साहित्य भाड्याने घेतलेले असणे, नक्षलवाद्यांच्या भीतीने काम तातडीने पूर्ण करायच्या हेतूने दिवस-रात्र काम सुरु असल्याची खबर नक्षलवाद्यांना मिळणे, दिनांक १३ जानेवारी, २०१३ रोजी दुपारी दोन वाजता सुमारे ५० ते ६० नक्षलवादी घटनास्थळी दाखल होऊन बंदुकीचा धाक दाखवून कामगारांना पळवून लावण्यात येणे, सर्व वाहनांवर रॉकेल टाकून आग लावून गावकऱ्यांवर दहशत निर्माण करणे, या घटनेमुळे नक्षलग्रस्त भागात विकासाला खीळ बसणे, शासनाने नक्षलग्रस्त भागात सुरु असलेल्या कामांमध्ये पोलीसांचा कडक बंदोबस्त तैनात करुन काम करुन घेणे तसेच नक्षल शोधमोहिम अधिक तीव्र करुन नक्षलवाद्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : लक्षवेधी सुचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे :-**

**दुग्धविकास मंत्री** : **"मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व), आरे दुग्धवसाहत येथील आदिवासी पाडे हे मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित असणे."** या विषयावरील सर्वश्री रविंद्र वायकर व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २५ मार्च, २०१० रोजी उत्तरित झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**सात : शासकीय विधेयक :-**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१३.

**आठ : अल्पकालीन चर्चा - (म.वि.स. नियम १०१ अन्वये) -**

**(दिनांक १९ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अल्पकालीन चर्चेची सूचना)**

**सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, नाना पटोले, प्रा. राम शिंदे, श्री. एकनाथ खडसे (पाटील), डॉ. संजय कुटे, श्री. गोवर्धन शर्मा, डॉ. खुशाल बोपचे, श्री. सुभाष देसाई, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"दिनांक १४ फेब्रुवारी, २०१३ रोजी भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील मुरमाडी येथे तीन अल्पवयीन बहिणींवर बलात्कार होऊन त्यांची हत्या करण्यात आल्याची भीषण घटना घडणे, माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या अमानवीय घटनेमुळे भंडारा जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळणे, या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात पोलीसांना अद्याप यश आलेले नसणे, शासनाच्या वतीने नऊ पोलिस पथकांची नियुक्ती करण्यात येणे, तथापि सदरची घटना घडून २६ दिवसांचा कालावधी उलटूनही खरे आरोपी अद्यापही मोकाटच असणे, आरोपींचा त्वरित शोध घेण्याकरिता व त्यांना कठोर शिक्षा होण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी तीव्र स्वरुपाचे आंदोलन करणे, या घटनेच्या निषेधार्थ मशाल मोर्चाही काढण्यात येणे, या घटनेबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने राज्य शासनाला अहवाल सादर करण्यासाठी नोटीस दिली असणे, या घटनेबाबत अलिकडेच प्राप्त झालेल्या शवविच्छेदन व फॉरेन्सिक अहवालात उघडकीस आलेली मतभिन्नता, शासनाने सदर घटनेचा तपास तात्काळ सीबीआयमार्फत करण्याची आवश्यकता व मुलींच्या आईला आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजी श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे दलित महिलेचे अपहरण करुन तिच्यावर अमानुष अत्याचार करणे, आरोपी दानीश शेख व अमन शेख हे उपनगराध्यक्षांचे पुतणे असणे, पोलिसांनी तब्बल चार दिवस गुन्हा नोंद न करणे व अतिरिक्त पोलिस अधीक्षकांच्या हस्तक्षेपानंतरच आरोपींना अटक होणे, सदर आरोपी संघटित गुन्हेगारी टोळी चालवित असल्यामुळे त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी कायद्याप्रमाणे कारवाई होण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे कुही, जि.नागपूर येथे आदिवासी समाजाच्या घरावर दरोडा टाकून मुलीवर केलेल्या बलात्काराची नुकतीच घडलेली घटना, श्रीरामपूर व कुही येथील पीडित कुटुंबांनाही शासनाकडून कोणतीही मदत न मिळणे, एकूणच राज्यातील दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय महिलांवर वाढत असलेले अत्याचाराचे प्रमाण, त्यांच्या होणाऱ्या हत्येच्या घटना व या घटनांमधील आरोपींना अटक करण्यात शासनाला येत असलेले अपयश, दलित व आदिवासी समाजामध्ये याबाबत पसरत असलेला प्रचंड असंतोष, आरोपींना त्वरित अटक करण्याची व पीडितांना तातडीने आर्थिक मदत करण्याची आवश्यकता."

**नऊ : सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), सुभाष देसाई, सुधीर मुनगंटीवार, गिरीष बापट, रविंद्र वायकर, देवेंद्र फडणवीस, संभाजी पवार, नाना पटोले, श्रीमती मिनाक्षी पाटील, श्री. आर.एम.वाणी, डॉ.सुधाकर भालेराव, प्रा.राम शिंदे, श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात सर्वशिक्षा अभियान यशस्वीपणे राबविण्यात शासनास आलेले अपयश, राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या अध्यापनातील प्रगतीसंबंधी 'प्रथम' या संस्थेने केलेल्या 'असर'च्या पाहणी अहवालात देशाच्या तुलनेत राज्यातील शिक्षकांचा दर्जा घसरला असून तिसरी व पाचवीच्या ४१ टक्के मुलांना गणित अजिबात येत नसल्याचे आणि राज्यातील शाळांमध्ये आवश्यक त्या सोयीसुविधा तसेच शाळांचे मूल्यमापन होत नसल्याचे उघडकीस येणे, तसेच राज्यातील अशासकीय अध्यापक विद्यालयांच्या शासनाने केलेल्या तपासणीत राष्ट्रीय शिक्षक व प्रशिक्षण परिषदेच्या निकषांची पूर्तता केली जात नसल्याची व तेथे देण्यात येणारे शिक्षण आणि विद्यालयासंबंधी उघडकीस आलेल्या धक्कादायक बाबी, तसेच राज्यात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या सेंट्रल टिचर्स एलिजिबिलीटी टेस्टमध्ये (सीटीईटी) केवळ ९ टक्के शिक्षकच उत्तीर्ण होणे, केंद्रीय शाळांप्रमाणे राज्यातील सर्व शाळांसाठी अशी परीक्षा बंधनकारक केल्यास

हजारो अध्यापक नापास होण्याची व्यक्त करण्यात येत असलेली भीती, सदरहू तपासणीमध्ये नागपूर, लातूर, नांदेड इत्यादी जिल्ह्यात विरोध होऊन अनेक विद्यालये बंद झालेली असल्याचे देखील लपविण्यात आल्याचे उघडकीस येणे, सदरहू तपासणीसंबंधी शासनाला प्राप्त होणाऱ्या अहवालाचे मूल्यमापन व तपासणी करण्यासाठी शासनाने मूल्यमापन समिती स्थापन करणे, राज्यातील अध्यापक विद्यालयांमध्ये सुमार दर्जाच्या दिल्या जाणाऱ्या शिक्षणामुळे गेल्या १० वर्षात या विद्यालयांमधून शिक्षण घेतलेल्या हजारो शिक्षकांच्या गुणवत्तेबाबत निर्माण झालेली साशंकता, परिणामी राज्यातील शिक्षकांचा दर्जा व गुणवत्तेबाबत निर्माण झालेल्या प्रश्नासंबंधी शासनाने तातडीने त्या अहवालाची योग्य दखल घेऊन मूल्यमापन समितीने केलेल्या शिफारशीनुसार आवश्यक त्या उपाययोजना व कार्यवाही करण्याची आवश्यकता, राज्यात शिक्षणाच्या झालेल्या दुरावस्थेमुळे महाराष्ट्राच्या भावी पिढीचे भविष्य अंध:कारमय होण्याच्या भीतीने विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम, तसेच राज्याचे युवक व क्रीडा धोरण कागदावरच असून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात शासनाला आलेले अपयश, एकूणच राज्यातील शिक्षणाचा घसरलेला दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने, भावी पिढी चांगली व सशक्त निर्माण होण्याकरिता शासनाने शिक्षण व क्रीडा धोरण यशस्वीरित्या राबविण्याची आवश्यकता."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) - गतसत्रातील प्रलंबित (सूचना क्रमांक १ ते ३)**

(१) **श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"चंद्रपूर जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिकरणामुळे चंद्रपूर जिल्हा प्रदुषणात देशात चौथ्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आलेला असणे, प्रदुषणामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले असणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या नियमांचे उद्योजकांकडून उल्लंघन होत असल्यामुळे प्रदुषणात दिवसेंदिवस भर पडत असणे, सांडपाणी व्यवस्थापन होत नसल्यामुळे दुषित पाणी रस्त्यावर येवून लगतच्या शेतात व नाल्यात जात असणे, जड वाहनांकरीता ठरवून दिलेल्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात प्रदुषणात भर पडत असून रस्ते खराब होत असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदुषणाला आळा घालणे अत्यंत गरजेचे असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(२) **श्री.विजयराज शिंदे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यभरातील देवस्थान इनाम वर्ग ३ च्या जमिनी ज्या इनामदारांना देण्यात आल्या होत्या त्या जमिनी बहुतांश ठिकाणी मूळ इनामदारांकडे नसणे, सदर जमिनीवर इतरांनी अवैधपणे कब्जा केलेला असून काही ठिकाणी तर सात-बारा व महसूल दप्तरात नियमबाहय नोंदी केलेल्या असणे, देवस्थान वर्ग ३ चे मूळ इनामदार यामुळे त्यांच्या हक्कापासून वंचित होणे, त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा निर्माण झालेला प्रश्न, त्यांचेवर उपासमारीची आलेली वेळ, इनामदारांना शासनाचे कोणतेही संरक्षण

नसल्याने सद्य:स्थितीत ज्या जमिनी मूळ इनामदार किंवा त्यांच्या कुटूंबियांकडे आहेत त्या जमिनीही हडप करण्याचे इतरांनी चालविलेले प्रयत्न, देवस्थान इनाम वर्ग-३ च्या जमिनीव्यतिरिक्त इतर इनाम जमिनी जसे (देशमुख, देशपांडे, महार व इतर) इनाम जमिनी खालसा करुन शासनाने त्या-त्या इनामदारांना किंवा त्यांच्या वारसांना कायमस्वरुपी हक्काने दिलेल्या असणे, त्याचप्रमाणे देवस्थान इनाम वर्ग ३ च्या जमिनी खालसा करुन मूळ इनामदार किंवा त्यांच्या वारसांना कायमस्वरुपी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात असलेल्या विपुल वनसंपदेचा योग्य वापर करत राज्यात वनांवर आधारित उद्योगांची निर्मिती करण्याची नितांत आवश्यकता, मध, काथ, डिंक, चारोळी, मोह, पळस आदींच्या माध्यमातून उद्योगांची निर्मिती करुन बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याची गरज, छत्तीसगड राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात वनांवर आाधारित उद्योगांची निर्मिती करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(दिनांक १४ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्रमांक ४ व ५)**

(४) **श्री. विजय घोडमारे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर शहरातील सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल ट्रान्सप्लांट युनिट ३ वर्षापासून बंद असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, किडणी स्टोनच्या उपचारासाठी असलेले लिथोट्रिप्सी मशिन तंत्रज्ञाअभावी बंद असणे, मेयो आधुनिकीकरणाची प्रक्रिया मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, या वर्षी मेयोचा अपेक्षित विकास न झाल्याने एम.बी.बी.एस.च्या ४० जागा कायम रद्द होण्याचा संभाव्य धोका टाळण्यासाठी विकास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मेयो प्रशासनाने वैद्यकीय संचालनालयाकडे पत्र देणे, मेडीकल प्रशासन कॅन्सरग्रस्तांच्या बाबतीत उदासीन असल्याने प्रतिक्षा यादी मोठ्या प्रमाणात वाढणे, रेडिओथेरपी तंत्रज्ञांची कमतरता असणे, राज्यात नागपूर येथील एम.डी. रेडिओथेरपी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे, या अभ्यासक्रमाकरिता यंत्र सामुग्रीची पूर्तता केलेली नसणे, संस्थेतील कोबाल्ट यंत्रही जुने झाल्याने त्याची क्षमता ५०% पेक्षा कमी झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(५) **श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

" भटक्या व विमुक्त (धनगर) समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गठीत रेणके आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात विलंब होणे, राज्यात धनगर समाजाची लोकसंख्या सुमारे दीड करोड असून ९०% लोकांकडे हक्काची जमीन नसणे, धनगर समाजाला विकासाअभावी शासकीय योजनांचा फायदा मिळू न शकणे, तसेच कायदेशीर व्यवसाय नसल्याने समाज गुन्हेगारीच्या चक्रात फसणे, धनगर समाज सर्वात गरीब, निरक्षर आणि वंचित घटक असून ९८% लोक बेघर व भूमिहीन असणे, त्यामुळे धनगर समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

**(मंगळवार, दिनांक १९ मार्च, २०१३ रोजीच्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्रमांक ६ व ७)**

(६) **श्री.सुधीर मुनगंटीवार , वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व्हावे या मूळ उद्देशातून राबविण्यात येत असलेले सर्व शिक्षा अभियान यशस्वी करण्यासाठी करार कर्मचारी विषयतज्ञ (साधनव्यक्ती) यांनी अहोरात्र परिश्रम घेणे, राज्यभरात या योजनेअंतर्गत कंत्राटी पध्दतीने सुमारे २० हजार कर्मचारी कार्यरत असणे, राज्यात कंत्राटी पध्दतीने ६-६ महिन्यांच्या कालावधीत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सदर कर्मचारी गत १२ वर्षापासून कार्यरत असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतची मागणी प्रलंबित असणे,राज्यातील सर्व करार कर्मचारी हे उच्च शैक्षणिक अर्हताधारक असून कामाचा प्रदीर्घ अनुभव त्यांना असणे, सदर करार कर्मचाऱ्यांची नियुक्ती गुणवत्ता तसेच बिंदुनामावली नुसार शासकीय भरती प्रक्रियेच्या विहित नियमावलीप्रमाणे जिल्हा निवड समितीमार्फत विविध पदांवर करण्यात येणे, राज्यातील बऱ्याच सुशिक्षितांनी या प्रकल्पात काम करताना शासकीय सेवेसाठीची विहित वयोमर्यादा ओलांडणे, केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार सर्व शिक्षा अभियानातील उत्तम कार्याबद्दल महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असल्याचे जाहीर असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याच्या मागणीकडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(७) **श्री. संजय भेगडे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त्या करण्यात आलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणे, कृषी पदवी, पदविका उत्तीर्ण तसेच उच्चशिक्षित असलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अत्यल्प वेतनावर काम करावे लागणे, नियोजन विभागाच्या दिनांक २ मे २०११ च्या शासन निर्णयामध्ये ग्रामरोजगार सेवकांचे काम अर्धवेळ स्वरूपाचे असेल असे नमूद असतानाही त्यांना रात्रंदिवस काम करावे लागणे, वाढत्या महागाईच्या काळात त्यांना केवळ सव्वादोन टक्के कमिशनवर कुटूंबाची गुजराण करावी लागणे व त्यांना आर्थिक हालअपेष्टांचा सामना करावा लागणे, त्यांना त्यांच्या शैक्षणिक योग्यतेनुसार शासनसेवेत सामावून घेण्यात यावे या व अन्य मागण्या शासनदरबारी प्रलंबित असणे, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० मार्च, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.